**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२८३/२०१५**
**महाराष्ट्र शासन वि. सचिन जाधव**
**निशाणी – १६**

**साक्षीदार क्रमांक २**

| | | |
|---|---|---|
| साक्षीदाराचे नाव | – | गिरीधर मच्छिंद्रनाथ कोरे |
| वय | – | ४६ वर्षे |
| व्यवसाय | – | खाजगी नोकरी |
| राहणार | – | देवगिरी व्हॅली, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर |

**<u>फिर्यादीतर्फे सरतपास सहाय्यक सरकारी विधिज्ञ श्री. एस. बी. भोसले यांचे मार्फत सुरु</u>**

०१. मी सध्या देवगिरी व्हॅलीमध्ये राहतो. मी घटनेच्या देवगिरी व्हॅलीसमोर थांबलो होतो. त्यावेळी पोलिस तिथे हजर होते. त्यांनी मला विचारले की, तुम्ही घडलेली घटना पाहिली का असे विचारले होते. त्यावेळी मी सदरची घटना बघितली आहे असे सांगितले होते. त्यावेळी त्यांनी मला पंच होण्यास विनंती केली. त्याप्रमाणे मी पंच होण्यास संमती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला. सदरचे घटनास्थळ हे देवगिरी व्हॅलीसमोर आहे. ॲक्टीव्हा गाडी जात असतांना पाठिमागुन कार आली व तिने धडक दिली. ॲक्टीव्हा गाडीचे नुकसान झाले व कारची काच फुटली होती. ॲक्टीव्हा वर असलेले तीन जणांना गंभीर दुखापत झाली होती. घटनास्थळाच्या चतु:सिमा मला सांगता येतील. पुर्वेला औरंगाबाद रोड, पश्चिमेला वैजापुरकडे जाणारा रोड, दक्षिणेला देवगिरी व्हॅली, आणि उत्तरेला रिकामी जागा होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्रमांक पी.२/पी.डब्ल्यु.२** देण्यात येते.
**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एस.बी. फदाट यांचे मार्फत सुरू–</u>**

०२. पोलिसांनी मला नोटीस दिलेली नव्हती. अनिल गंगणे यांना मी ओळखत नाही. सदर घटना ही २०.०७.२०१४ रोजीची आहे. सदर घटनेचा पंचनामा दिनांक २०.०७.२०१४ रोजी झाल्यानंतर माझी व पोलिसांची भेट झाली नाही. दिनांक २०.०७.२०१४ रोजी मी किती कागदांवर सह्या केला हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी कागदावर लिहुन घेतले व त्यावर माझी सही घेतली. हे

म्हणणे खरे नाही की, पोलिस लिहीत असतांना त्यांनी माझी विचारपुस केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस मला विचारत होते व एक एक ओळ लिहुन घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस लिहित होते व मला थांबवत होते. दिनांक २०.०७.२०१४ रोजी माझ्या समक्ष ज्या गाडीचा अपघात झाला त्या गाडीचा नंबर मी पोलिसांना सांगितला होता. सदरची गाडी कोणाची आहे व ड्रायव्हर कोण आहे याबद्दल मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनास्थळ हे रहदारीचे आहे. मी INDURANCE कंपनीत नोकरीला आहे. माझ्या कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ५.३० अशी आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी कंपनीत होतो. पोलिसांना मी कामकाजाची लिस्ट दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळातील चतु:सिमा या माझ्या रोजच्या पाहण्यातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणताही अपघात घडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा घेतला नाही व अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अनिल गंगवे हा माझ्या ओळखीचा असल्याने त्याला मदत करण्यासाठी मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २०.०७.२०१४ रोजी माझ्या व्यतिरिक्त इतर कोणाचीही तसेच पोलिसांची भेट झाली नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती.**

Digitally signed by SNEHAL SHANKAR JADHAV
Date: 2025.08.28 11:06:10 +0530

**दिनांक –२५.०८.२०२५**
**ठिकाणी – औरंगाबाद**

**(स्नेहल एस. जाधव)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**(न्यायालय क्र.१३), औरंगाबाद**